नि. दि. दावा क्र. ३०४-२०२३
निशाण क्र. ५९ ची पुरवणी

**<u>वादी साक्षीदार क्र.१ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. २, ३, ५ व ६ तर्फे वकील श्री. बी.टी.हिरडे यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

मी सर्व वादींच्या वतीने साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुनिता ही माझे भाऊ बाबासाहेब याची पत्नी आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे माझे आई वडील असुन त्यापैकी वडील हे मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई आज सुध्दा केशव यांचे सोबतच राहणेकामी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी सचिन व राहुल यांचे नावे वादग्रस्त मिळकतीच्या क्षेत्राचे बक्षिसपत्र करुन दिलेले आहे. साक्षीदार सांगते की, ती आम्हाला कोणालाही माहित नसताना वडीलांच्या आजारपणात करून घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात सुध्दा माझे आई वडीलांनी त्यांना येणारा हिस्सा सचिन व राहुल यांचे हक्कात देण्याबाबत संमती दर्शिविलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १०३ पैकी सुनिता नागरगोजे हिच्या नावे ०१हे.८२आर., दस्त क्र. ४७८०/२०१८ च्या माध्यमातुन माझे वडीलांकडुन खरेदी खत कोणतीही रक्कम न देता खोटे करुन घेतलेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकती मध्ये आम्हाला कोणतेही क्षेत्र घेण्याची इच्छा नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची प्रस्तुत दाव्याच्या माघील तारखेपर्यंत अशीच इच्छा होती की, भावांनी तडजोड होवून समान हिस्सा घ्यावी अशी होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जुन बडे हे सैन्य दलात होते. हे म्हणणे खरे आहे की, अर्जुन, सदाशिव व विष्णु हे आपसात भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे भावाचे आपसात पटत नसल्यामुळे आम्ही दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्याकामी कोणतेही कारण घडलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मी पुणे येथे राहत असून तेथे आम्ही घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी माझे घर बांधण्यासाठी पाच लाख रुपये दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी मला घर घेणेसाठी मोठी रक्कम दिलेली असल्यामुळे मी शेतीतील माझा हक्क सोडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र देवून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

नि. दि. दावा क्र. ३०४-२०२३
निशाण क्र. ५९ ची पुरवणी

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

**<u>वादी साक्षीदार क्र.१ यांची उलटतपासणी प्रतिवादी क्र. ४ व ७ तर्फे वकील श्री. पी.बी.पवार यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

प्रतिवादी क्र. ४ व ७ यांना पुकारले असता गैरहजर. प्रतिवादी क्र. ४ व ७ चे विधिज्ञांनी निशाण क्र. ६२ प्रमाणे दिलेल्या मुदतीच्या अर्जावरील आदेशान्वये पुढील मुदत देण्यात आली.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दि. २४–०९–२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा